CNR No.MHWS040003962018

**नि.दि.दावा क्र. १८/२०१८**
**संतोष वि. न.प.मंगरूळपीर**

**आदेश निशाणी ७३ वर**

अर्जाचे अवलोकन केले. वादीचे म्हणणे ऐकून घेतले. अभिलेखाची पडताळणी केली असता असे दिसून येते की, दिनांक २३.५.२०१८ रोजी प्रस्तुत दिवाणी दावा क्र. १८/२०१८ मध्ये मा. विदयमान दिवाणी न्यायालयाने तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारीत केला होता आणि त्या आदेशान्वये सदर दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादीने वाद मालमत्तेला कोणताही प्रकारचा अडथळा निर्माण करू नये असे आदेशीत करण्यात आले होते.

२. सदरचा दावा हा आजरोजी न्यायालयात प्रलंबीत असून दाव्यामध्ये पारीत केलेल्या तात्पुरत्या मनाई हुकूमाचा आदेश आजरोजी सुध्दा अस्तित्वात आहे. प्रकरणामध्ये कोणत्याही प्रकारचा स्थगन आदेश अपीलय न्यायालयातून आलेला नाही म्हणून वादीचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. प्रतिवादीला आदेशीत करण्यात येते की, निशाणी ५ वरील दिनांक २३.५.२०१८ रोजीचा आदेश आजरोजी सुध्दा अस्तित्वात असून सदरचा दावा निकाली लागेपर्यंत त्या आदेशाचे पालन करण्यात यावे.

**स्वा/—**
(सुभाष द. तारे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
मंगरुळपीर

दिनांक २७/६/२०२५

CNR No.MHWS040003962018

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | :- | 2nd Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Mangrulpir, Dist. Washim. |
| Presiding Officer | :- | Subhash D. Tare |
| Judgment uploaded by | :- | C.R.Gadge (Stenographer L.G) |
| Date of Judgment | :- | 27.6.2025 |
| Judgment/Order signed by the presiding officer on | :- | 27.6.2025 |
| Judgment/Order uploaded on | :- | 27.6.2025 |